**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी दावा क्र. २३६/२०१५**

**निशाणी ७० लगत आदेश**

**(सोपान विरुध्द नाना )**

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, दाव्याचे काम चालू असताना प्रतिवादी क्र. २ सजाबाई नाना माने या दि. १२.०४.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. वादी हे आजारी असल्याने त्यासंना वेळेत वारस अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिजलेखावर आणण्यास २ वर्ष १ महिन्याचा विलंब झाला आहे. सदर विलंब माफ होणे आवश्यक आहे. तरी प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जावरती प्रतिवादीतर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादीचे कथन की, प्रतिवादी क्र. २ मयत होवून २ वर्ष ५ महिने झाले आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अभिलेख तपासून पाहिले असता वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. ०२ या दि. १२.०४.२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदरकामी वारस ९० दिवसांचे आत अभिलेखावर घेणे जरुरी होते, परंतु वादीला मयत प्रतिवादी क्र. २ चे वारसांना वेळेत वारस अभिलेखावर आणता आलेले नाही.

त्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. सदर कथनांच्या पुष्टयर्थ वादीने निशाणी ७१ येथे शपथपत्र दाखल केले आहे. तरी देखील मुदतीमध्ये वारस रेकॉर्डवर न घेतल्याची बाब स्पष्ट होते. वादींनी अर्जामध्ये नमूद केलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता, वादाचा विषय गुणदोषावर निर्गत होणे आवश्यक आहे. जर प्रतिवादी क्र. २ चे वारसांना अभिलेखावर घेण्याची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही, तर ते त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहू शकतात. त्याहीपेक्षा तुर्तास दावा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे. अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढून आणखी जटील बनू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ७०) वादीने रक्कम रु. १,०००/– (रु. एक हजार मात्र) खर्च देण्याचे अटीवर मंजूर करणेत येतो.

२. सदर दंडाची रक्कम प्रतिवादी यांना अदा करणेत यावी.

२. मयत प्रतिवादी ०२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

सांगोला (श्री. संजय मो. घुगे)

दिनांक – १२/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.